**ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी जिल्हा परिषदेअंतर्गत कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचारीवृंदाच्या सेवा "जिल्हा पाणी पुरवठा व स्वच्छता अभियाना" करिता उपलब्ध करुन देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्र :ग्रापापु-१०००/ प्र.क्र. १०८ / पापु. ०७**
**मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक ५ जानेवारी, २००१**

**वाचा :** १) शासन निर्णय पा.पु. व स्व. वि.क्र. ग्रापापु १०९९/ प्र.क्र.३२८/ पापु ०७ दिनांक २७ जुलै, २०००.

२) शासन निर्णय पा.पु.व स्व.वि.क्र.संस्वअ २०००/प्र.क्र.३५२/ पापु १६ दिनांक २७ जुलै, २०००.

**प्रस्तावना :**

ग्रामीण पाणी पुरवठा व ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमासाठी केंद्र शासनाने सन १९९९ मध्ये सुधारित मार्गदर्शक सूचना लागू केल्या असून या सुधारित मार्गदर्शक सूचनांनुसार धोरणात्मक सुधारणांचा कार्यक्रम राबविण्यासाठी देशभरातील विविध राज्यातील ५७ जिल्हयांची निवड केली आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील रायगड, धुळे, नांदेड व अमरावती या ४ जिल्हयांची पथदर्शी जिल्हे म्हणून निवड केली आहे.

२. केंद्र शासनाच्या या सुधारित मार्गदर्शक सूचनांनुसार योजनेची निवड, आखणी अंमलबजावणी आणि देखभाल व दुरुस्ती यामध्ये लोकसहभाग आवश्यक करण्यात आला आहे. तसेच योजनेच्या भांडवली खर्चाचा १०% व देखभाल, दुरुस्ती खर्चाचा १००% भाग लाभार्थ्यांनी उचलणे आवश्यक करण्यात आले आहे. केंद्र शासनाच्या या सुधारित मार्गदर्शक सूचना ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी संपूर्ण राज्यासाठी लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्याबाबतचे आदेश संदर्भिय क्र.१ येथील शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आले आहेत. तर ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम "संपूर्ण स्वच्छता अभियान " म्हणून पथदर्शी जिल्हयांत राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्याबाबतचे आदेश संदर्भिय क्र. २ येथील शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आले आहेत.



३८७

३.	केंद्र शासनाच्या सुधारित मार्गदर्शक सूचनांनुसार धोरणात्मक सुधारणांचा कार्यक्रम पथदर्शी जिल्हयांमध्ये राबविताना ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम परिसर स्वच्छतेशी व वैयक्तिक स्वच्छतेशी निगडीत करुन राबविण्यात येणार आहे. पथदर्शी जिल्हयांमध्ये हा धोरणात्मक सुधारणांचा कार्यक्रम राबविण्यासाठी केंद्र शासनाने काही कार्यपध्दती व तत्त्वे घालून दिली आहेत. तसेच हा कार्यक्रम राबविण्यासाठी जिल्हा स्तरावरील यंत्रणेला केंद्र शासनाकडून निधी दिला जाणार असून हा निधी केंद्रशासन परस्पर जिल्हा यंत्रणेकडे सुपूर्द करणार आहे. हा निधी जिल्हा यंत्रणेकडे सुपूर्द करणे सोपे व्हावे व हा कार्यक्रम राबविण्यासाठी जिल्हास्तरावर स्वतंत्र यंत्रणा असावी म्हणून जिल्हास्तरावर "जिल्हा पाणी पुरवठा व स्वच्छता अभियान" व ग्रामस्तरावर "ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती " अशा स्वतंत्र "यंत्रणा " निर्माण करण्याचा आग्रह केंद्र शासनाने धरला होता. त्यानुसार या पथदर्शी जिल्हयांमध्ये वरील जिल्हास्तरावरील स्वतंत्र "यंत्रणा "व ग्राम सतरावरील समिती आस्थापित करावयाच्या आहेत.

४.	रायगड, धुळे , नांदेड व अमरावती या चार पथदर्शी जिल्हयांमध्ये केंद्र शासनाच्या सुधारित मार्गदर्शक सूचनांनुसार धोरणात्मक सुधारणांचा कार्यक्रम राबविण्यासाठी प्रत्येक जिल्हयांत जिल्हास्तरावर " जिल्हा पाणी पुरवठा व स्वच्छता अभियान " अशी स्वतंत्र "यंत्रणा" निर्माण करण्यात आली असून ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमांतर्गत योजनांची निवड आखणी अंमलबजावणी व्यवस्थापन देखाभाल व दुरुस्ती प्रसिध्दी व पर्यवेक्षण इ. कामे या अभियानामार्फत करण्यात येणार आहे. या अभियानावर जिल्हा परिषदेचे संनियंत्रण राहणार आहे.

५.	धोरणात्मक सुधारणांचा हा कार्यक्रमा पथदर्शी जिल्हयांमध्ये या अभियानामर्फत राबविण्यसाठी जिल्हा परिषदे अंतर्गत कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवा या कामाकरीता अभियानास उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींच्या सर्वसाकल्याने विचार करुन महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ च्या कलम २६१ (१) अनुसार शासनांस असलेल्या अधिकारांचा वापर करुन उक्त अधिनियमाच्या कलम २६१ (२) (अ) नुसार रायगड, धुळे, नांदेड व अमरावती जिल्हा परिषदेअंतर्गत पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाशी संबंधित सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवा संबंधित जिल्हयातील " जिल्हा पाणी पुरवठा व स्वच्छता अभियानास" केंद्रशासनाच्या सुधारित मार्गदर्शक सूचनांनुसार ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम व ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमांतर्गत संपूर्ण स्वच्छता अभियानाचा धोरणात्मक सुधारणांचा कार्यक्रम राबविण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.



३९८

२. जिल्हा परिषदेच्या अधिका-यांच्या व कर्मचा-यांच्या सेवा जिल्हा पाणी पुरवठा व स्वच्छता अभियानासाठी जरी उपलब्ध करुन देण्यात आल्या असल्या तरी ते अधिकारी व कर्मचारी जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवर त्या त्या संवर्गात कार्यरत राहतील व त्यांचे वेतन व भत्ते सध्याप्रमाणेच शासनामार्फत/ जि.प. मार्फत देण्यात येतील व यांसाठी कोणतेही अतिरिक्त अनुदान शासनाकडून जिल्हा परिषदेस देण्यात येणार नाही.

३. हे आदेश ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

**(सुधीर ठाकरे)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत.

मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव,
मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद, रायगड, धुळे, नांदेड व अमरावती
मा. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
विभागीय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव, (प्रशासन) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सदस्य सचिव, (तांत्रिक) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रायगड, धुळे, नांदेड व अमरावती
अधिक्षक अभियंता तथा जिल्हा पाणीपुरवठा अधिकारी, रायगड, धुळे, नांदेड व अमरावती
कार्यकारी अभियंता. ग्रामीण पाणी पुरवठा विभाग रायगड, धुळे, नांदेड व अमरावती
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती पापु-०७



३११